प्रमाणाभाव असिद्ध आहे? अशा भास्कर शंकांचे येता- 'येथे कोणी?' शंकानुसार ममर्मीय तेचे अध्यासत्व दाखवितात- धर्मब्रह्मजिज्ञासेत: 'यदेव विद्यया करोति श्रद्धयोपनिषदा तदेव वीर्यवत्तरं भवति' (छां. १।१।१०) इत्यादि वाक्यांच्या अनुरोधावरून (वाक्यार्थ) विधाकर्मांना एकाधिकारत्व प्रतीत होते असा अर्थ. ज्योतिष्टोम व उद्गीथादिकांना एकाधिकारत्व असो तरी धर्मब्रह्मजिज्ञासेला अधिकृताधिकारत्व कळविणारे नाही असे सांगतात- 'तो निश्चित' ज्ञान अविशेषा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

क्रमो विवक्षितः, शेषशेषित्वेऽधिकृताधिकारे वा प्रमाणाभावात् धर्म

॥ व्याख्यान ॥

'क्रमो न विवक्षितः' = क्रम विवक्षित नाही. कारण 'धर्मब्रह्मजिज्ञासयोः' - धर्म व ब्रह्मजिज्ञासेच्या 'शेषशेषित्वे' = अंगांगीभावाविषयी 'वा अधिकृताधिकारे' = किंवा अधिकाऱ्याच्या अधिकाराविषयीं 'प्रमाणाभावात्' = प्रमाणाचा अभाव आहे.

॥ विवरण ॥

मंदभाग्यत्व आहे. कारण निरूपित विधि चतुष्टय धर्मविशेष अशा उद्गीथादि उपासनांच्या भेदादि माध्याय
१२३।१८ (= ~~मनुष्योपासकांना चित्तैकाग्र्याद्वारा निर्गुण ज्ञान साधकत्व साम्यामुळें. रत्नप्र. ५४०।१८~~)
प्रत्ययत्व साम्यामुळे प्रासंगिकत्वाने ब्रह्म प्रकरणांत निरूपितत्व आहे. शास्त्रतात्पर्याने कळणाऱ्या ब्रह्म-ज्ञानानंतर कर्मांत अधिकृताच्या अधिकारत्वाचा अभाव आहे. पण एकविधि प्रभृति अनुष्ठेयत्वेन आ-

॥ विवरणव्याख्यान ॥

पुढे येथेंही अधिकृताधिकारत्वाची कल्पना करावी? अशी आशंका असतां वेगळ्याने उत्तर सांगतात - 'कारण निरूपित विधिचतुष्टय' = धर्मप्रतिपादकत्वाने निरूपित उत्पत्यादि विधिचतुष्टय आहे ज्यांत असे. हे धर्म विशेषांचे विशेषण आहे. उपासनांना धर्मत्व असतां ब्रह्ममीमांसेत कशामुळे प्रतिपादन आहे? यावर सांगतात - 'प्रासंगिकत्वा (= मनुष्योपासकांना चित्तैकाग्र्य द्वारा निर्गुण ज्ञान साधकत्व [illegible] रत्नप्र. ५४०।१८) असल्यामुळे ने' प्रासंगिकत्वाचे कारण सांगतात - 'प्रत्ययत्वसाम्यामुळे' तथापि निरूपितांचे निरूपण व्यर्थ आहे? त्यावर सांगतात - 'भेदादि पर्यालोच' वेदनाप्रमाणत्वाने उपासनांच्या धर्मत्वाचा आश्रय करून प्रसंगाने भेदाभेद निरूपण केले जातात. असा अर्थ. धर्मांना चोदनाप्रमाणत्व असून ब्रह्मालाही तादृकत्व असल्यामुळे धर्मता आहे? अशी आशंका असतां हेतूच्या असिद्धीस सांगतात 'शास्त्र' विधिरहित वेदवचन शास्त्र शब्दाचा अर्थ आहे. दोन्ही विचारांच्या एक-विधि प्रयुक्तत्वाने क्रमाचे भेद निराकरण करण्याची इच्छा असल्यामुळे फलाच्या भेदक शाखे सांगितले जाते? कल्पान्तराने उघडिले असले तरी क्रमाची सिद्धि होत नाही कारण कर्त्यांचा भेद असतां साधनाच्या यागपद्याची सिद्धि होत नाही? अशी आशंका असतां वर सांगितलेल्या दुसऱ्या विसदृश प्रश्नाला उत्थापन केले जाते. असे सांगतो - 'पण एकविधिमुळे' एकफलाच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ब्रह्मजिज्ञासयोः फलजिज्ञास्यभेदाच्च । अभ्युदयफलं धर्मज्ञानं तच्च ।

॥ व्याख्यान ॥

६१।१८
आतां जसे आग्नेयादि सहा यागांचें एक फल स्वर्गविशेष आहे. तसें धर्म व ब्रह्म जिज्ञासेचेंही एक-
फळ स्वर्ग (=मोक्ष) आहे. त्यामुळे क्रमाची (=अध्यायांची) अपेक्षा असतां त्याच्या नियमार्थ 'अथ' शब्द आहे?
किंवा जसें बाराही लक्षणांनीं एक धर्म प्रतिलक्षण अंशान्तर परिशोधनानें जिज्ञास्य आहे.
किंवा जसें याच तन्त्रांत चारही लक्षणांनीं (=अध्यायांनीं) एक ब्रह्म जिज्ञास्य आहे व तेथें अंशान्तर परिशो-
धनानें लक्षणांच्या क्रमनियम आहे. तसें तंत्रद्वयानें एक ब्रह्म (=वेदार्थ) जिज्ञास्य असून
तेथें क्रमाच्या नियमार्थ 'अथ' शब्द आहे? अशी आशंका असतां सांगतात — 'फलजिज्ञास्य-
भेदाच्च' = धर्म व ब्रह्म जिज्ञासेच्या फल व जिज्ञास्यांत भेद असल्यामुळें ही क्रमविवक्षित नाही
असा अनुषंग. फ त्यांच भेदाला सांगतात — 'अभ्युदयफलम्' = अभ्युदय (=स्वर्गादि सुख) फ ६१।२८
ज्याचें फळ आहे असे 'धर्मज्ञानम्' = धर्माचें ज्ञान आहे. 'तच्च' तेंही. (पुढें १५६ पृष्ठावर)

विवरण

शिष्ट क्रमाविशेषाला अपेक्षित न्यायानुसरणपर 'अथ' शब्द नसो, परंतु एक फल प्रयुक्ति अनुष्ठेयतेनें, किंवा
एकप्रमेय जिज्ञास्य प्रयुक्ति अनुष्ठेयतेनें साधनद्वयांत कर्तैकत्वामुळें क्रमाचा आक्षेप असो? अशी उत्तरभा-
१६३।२२ ६२।१ १६३।२३
ष्याची आशंका सांगतात — 'आतां जसें आग्नेयादि'. 'ब्रह्मज्ञानाचें फळ मोक्ष सर' [६०९१।८] भाष्यापूर्वीपर्यंत

विवरणव्याख्यान

साधन अशा दर्शपूर्णमासांच्या युगपत् अनुष्ठानाच्या असंभव असल्यामुळें जसा क्रम आहे व एक जिज्ञास्य अशा द्वा-
दश लक्षणांच्या युगपत् प्रवृत्तीच्या असंभव असल्यामुळें जसा क्रम आहे. तसा येथेंही एक मोक्षफळ व एक वेदार्थ जिज्ञास्य-
५१०।१८
मुळें आहे. असा अर्थ. 'फलजिज्ञास्य भेदाच्च' येथें धर्म व ब्रह्म जिज्ञासेंच्या फळांचें वेळस्वरूप सांगितलें ते अनुपपन्न

टीप ॥

फ 'अभ्युदय' = विषयस्य आभिमुख्येन उदेति = विषयाच्या आभिमुख्यानें जो उदयाला प्राप्त होतो तो म्हणजे विषयाधीन स्वर्गादिसुख असा अर्थ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

ग्रंथ स्वष्टार्थ आहे. येथें हा आशय – धर्म व ब्रह्म ज्ञानाच्या एकफलत्वाविषयीं प्रमाण नाहीं. अर्थे (= साध्य) ही एक असणें युक्त नाहीं. कसें? विविदिषा वाक्याला तर शब्दसामर्थ्य व न्याय दोहींतही समुच्चयांत प्रामाण्य नाहीं असें सांगतात.

"विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह" [ई. ११] ह्याही समुच्चयाचा विधि नाहीं. कारण "अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते" [ई. ११] असा येथें फलभेद कळतो. "तेनैति ब्रह्मवित् पुण्यकृत्तैजसश्च" [ ] असाही

॥ विवरणव्याख्यान ॥

अहो कारण धर्मजिज्ञासेला अभ्युदय फलत्व असलें तरी प्रमाणानें धर्माला अन्यत्र निःश्रेयस फलत्व असल्यामुळें निःश्रेयस फलत्व आहे? अशी आशंका असतां तात्पर्य सांगतात – 'येथें हा आशय'. धर्म व ब्रह्मज्ञानांच्या योगानें एकसाध्य हें निरूपण करणें शक्य नाहीं असें सांगतात 'अर्थे ही'. प्रमाणाच्या असंभवाविषयीं प्रकार विचारतो 'कसें' तेथें काय

प्र. १ "तमेतम्" [बृ. ४।४।२२] हें विविदिषा वाक्य धर्म व ब्रह्म ज्ञानांच्या एकफलत्वाविषयीं प्रमाण आहे? किंवा 'वि- प्र. २ द्यां चाविद्यां च' [ई. ११] हें? किंवा प्र. ३ "तेनैति ब्रह्मवित् पुण्यकृत्तैजसश्च" [ ] हें वाक्य? अथवा प्र. ४ "तान्या-

चरथ" [मुं. १।२।१] हें? किंवा प्र. ५ "सत्येन लभ्यः" [मु. ३।१।५] हें वाक्य? किंवा प्र. ६ नित्यकर्म विधानाची अनुपपत्ति?

प्र. ७ किंवा ब्रह्मज्ञानाच्या करणतेची अनुपपत्ति? असे विकल्प करून पहिल्याच्या निरास करितात – उ. १ 'विविदिषा वाक्या-

ला तर'. 'यज्ञेन' या तृतीया श्रुतीने कर्मांना इष्यमाण ज्ञान करणत्वाविषयीं शब्दसामर्थ्य आहे; दुसऱ्या प्रमाणाच्या

बोधामुळें दोघांत कर्माच्या अन्वय कल्पनेची अनुपपत्ति न्याय आहे. त्यांच्या योगानें परीक्षा असतां असा अर्थ. उ. २ दुसऱ्या पक्षाच्या

निरास करितात – 'विद्यां चाविद्यां च'. अविद्या पदानें वर्णनीय कर्मांचा मृत्यु पदानें सांगितलेल्या कामांच्या निरसनांत उपयोग असून विद्येचा अमृतत्वांत आहे. अशा रीतीनें फलांच्या भेदाची सिद्धि आहे असा अर्थ. मग 'सह' शब्द अनुपपन्न आहे? असेंही नाहीं.

कारण 'सह' शब्द एकव ज्ञानांच्या उपायउपेयभाव विवक्षित आहे. असा अर्थ. उ. ३ तिसऱ्या पक्षाच्या निरास करितात – 'तेनैति'

'त्यानें' = देवयानमार्गानें. 'एति' = गमन करितो. ज्ञान व कर्म एका पुरुषाच्या आश्रयानें असतां एका फलाचें साधन आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

ज्ञानकर्मांच्या एका पुरुषांत समुच्चय विधि नाही. कारण येथे ब्रह्मवित् व पुण्यकरणाऱ्या पुरुषाच्या मार्गांत समुच्चय घडतो. म्हणून 'समुच्चय करणे' ह्याचा अर्थ आहे असा च कारानेही निरपेक्ष अशा प्रत्येकाच्या मार्गांत अन्वयाची उपपत्ति होते. 'पुण्यकृत्' शब्दाने तर अमानवपर्यंत अर्चिरादिकाने जाणाऱ्या प्रतीकोपासकांचे अभिधान आहे व ब्रह्मविद् शब्दाने सगुण ब्रह्मोपासकाचे विधान आहे. व इष्टादि करणाऱ्यांना तर धूमादि मार्गाचे श्रवण आहे." तान्याचरत.

॥ विवरणव्याख्यान ॥

असा श्रुतीचा अर्थ नाही. कारण दुसऱ्या श्रुतीचा विरोध आहे. परंतु जो ब्रह्माला जाणतो (= सगुण ब्रह्माची उपासना करितो) व जो पुण्याचे (सत्कर्माचे) अनुष्ठान करितो ते दोघेही याच मार्गाने जातात असा येथे मार्गाचा समुच्चय करतो असा अर्थ. चोदकांनी व्याकुळ मनांत पुरुषांचा जसा सांपडतात ते (ते) मार्गांत समुच्चय असतो. तसा 'च' शब्दप्रयोगाने यांचा (ब्रह्मविद्यावित् पुण्यकृतांचा) समुच्चय आहे? अशी आशंका असतां सांगतात - 'म्हणून'. निर्गुण ब्रह्मविद्येचा व कर्मांचा तर विरोधामुळे एकफलसाधन त्याने संबंध युक्त नाही. 'च' शब्दाची अनुपपत्तिही नाही. कारण सगुणब्रह्मोपासकांच्या व कर्मांच्या एकमार्गे समुच्चयाने 'च' शब्दाची उपपत्ति आहे. पण केवळ कर्मांना अर्चिरादिमार्गाचा संबंध प्रतिषिद्ध असल्यामुळे येथे समुच्चय विवक्षित आहे? यावर सांगतात - 'पुण्यकृत्' ('पुण्यकृत' शब्दाने येथे प्रतीकोपासक विवक्षित आहे. केवळ कर्मीलोक येथे अमानव पुरुषापर्यंत जातात. ब्रह्मलोकांत नव्हे. असा अर्थ.) पण साधारण शब्दाला प्रतीकोपासन विषयत्व कसे? यावर सांगतात - 'व इष्टादि करणाऱ्यांना' इष्टपूर्त आदि शब्दाचा अर्थ आहे. "अग्निहोत्रं तपः सत्यं वेदानां चानुपालनम्। आतिथ्यं वैश्वदेवं च इष्टमित्यभिधीयते॥ वापीकूपतडागादि देवतायतनानि च। अन्नप्रदानमारामः पूर्तमित्यभिधीयते॥ शरणागतसंत्राणं भूतानां चाप्यहिंसनम्। बहिर्वेदि च यद्दानं दत्तमित्यभिधीयते॥ [ ] येथे सांगितलेले कर्म इष्टादि शब्दाचा अर्थ आहे. 'धूमादिमार्ग' "तद्धूममभिसंभवन्ति धूमाद्रात्रिम्" [छां. ५।१०।३] या वाक्यांत केवळ कर्मींना पितृयान मार्गाचे श्रवण आहे असा अर्थ. अंड ग्रंथे पासक 'ब्रह्मवित्' शब्दाचा अर्थ आहे. चरणाचा पश्चात्ताप निरास करितात. 'तान्याचरत' असे शब्द परब्रह्मांत प्रसिद्ध असल्यामुळे त्याची इच्छा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

("सत्येन लभ्य" ...)

नियतं सत्यकामा" [मुं. १।२।१] यानेंही समुच्चय विधि करता नाही। कारण केवळ कर्मांचेंच येथें श्रवण आहे. सत्यश-ब्दानेंही "एष वः पुण्यः सुकृतो ब्रह्मलोकः" [मुं. १।२।६] अशा वाक्यशेषावरून सत्य लोकाचें अभिधान आहे व "प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा" [मुं. १।२।७] "नास्त्यकृतः कृतेन" [मुं. १।२।१२] अशा तऱ्हेनें कर्मनिंदेनें "तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्॥" [मुं. १।२।१२] असें ज्ञानाचें विधान आहे. "सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा" [मुं. ३।१।५] इतेंही समुच्चयाचा विधि नाही कारण तपशब्दानें "मनसश्चेन्द्रियाणां च ह्यैकाग्र्यं परमं तपः" [महाभारत ३।२६०।२५] असें ध्यानाचें विधान आहे. म्हणून समुच्चयाविषयीं प्रमाण नाही. "नान्यः पन्था विद्यतेऽयनाय"

॥ विवरणव्याख्यान ॥

करणाऱ्यांना कर्म कर्तव्यता उपदेशिली जाते व केवळाचा प्रतिषेध असल्यामुळे समुच्चय आहे, अशा पूर्वपक्षमताने श्रुत्यर्थ आहे-कार्ये हें साक्षात् समुच्चयाचें प्रतिपादक आहे। किंवा वाक्यशेषावरून। असा विकल्प करून पहिल्या पक्षाचा निरास करितात - 'कारण' दुसऱ्या पक्षाचा निरास करितात - 'सत्य शब्दानेंही'. जरी सत्य शब्द परब्रह्मांत प्रसिद्ध आहे तरी वाक्यशेषावरून ब्रह्मलोकाचा दिसतो आहे असा अर्थ. सत्य शब्दाचें प्रथम श्रवण असल्यामुळे वाक्यशेषापेक्षा त्याला प्राबल्य आहे। अशी आशंका असतां मुख्यार्थाचा असंभव असल्यामुळे सत्य शब्दाचा यथाश्रुत अर्थ नाही असें सांगतात - 'प्लवा ह्येते'. 'यज्ञरूपा' = यज्ञ ज्यांच्याकडून सिद्ध केले जातात ते यज्ञरूप, सोळा ऋत्विक् यजमान व पत्नी असे अठरा. 'प्लवा' = (नौका) प्रमाणें प्लव. "अदृढ" = अस्थिर असा अर्थ. मोक्षाच्या कर्मानें असाध्यत्वाविषयीं वाक्यान्तरांचें उदाहरण देतात - "नास्त्यकृतः कृतेन" 'अकृत' = मोक्ष 'कृतेन' = कर्मानें प्राप्त होत नाही असा अर्थ. पांचव्या पक्षाचा निरास करितात - 'सत्येन लभ्यः' सत्य शब्द ज्ञानपर्याय असून तपः शब्द ध्यानपर असा अर्थ आहे याविषयीं प्रमाण सांगतात - 'मनसः' सत्यवचन नव्हे असा पूर्वपक्षाचा अभिप्राय. समुच्चयाच्या अभावाविषयीं मूळ सांगतात 'कारण तपशब्दानें' ज्ञानांतही तपशब्द प्रसिद्ध आहे. त्यामुळे आत्मज्ञान परिशेषाणारहित। अशी आशंका असतां सांगतात - 'व नान्यः पन्था' 'अयनाय' = गमनाकरितां = मोक्षप्राप्तीकरिता असा अर्थ.

?

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

[मुं॰ १।२।१८] "नास्त्यकृतः कृतेन" [मुं॰ १।२।१२] "न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः"

[ना॰ उ॰ १२।१३] "नान्यो देव स्तपसा कर्मणा वा" [ ] "हित्वा सर्वाण्येव यात्ति विष्णोः परमं पदम्"

असो ज्ञानसाधनत्वानें कर्मांचा प्रतिषेध हा आहे? का केवळ कर्मांचा प्रतिषेध आहे? असें असेलतर नाहीं कारण येथें

तसा विरोध नाहीं. समुच्चय विधायी प्रमाणाचा अभाव असल्यामुळे सर्व कर्मांच्या प्रतिषेधाची उपपत्ति होते.

ज्ञानाच्या अंगत्वानें सर्व कर्मांच्या संन्यासाचे विधान असल्यामुळे हे समुच्चय नाही. संन्यासाश्रम धर्मांशी

समुच्चय आहे? असें असेल तर नाहीं. कारण सत्य धर्म ध्यानादिकांना ज्ञानस्वरूपोपकारित्व आहे. नित्य-

कर्मांच्या विधानाची अनुपपत्ति ज्ञान सहकारित्वाने कर्मांना मोक्षफलत्व कल्पितां येते? असें असेल तर नाहीं कारण

॥ विवरणव्याख्यान ॥

'देवांनी' इंद्रियांनी असा अर्थ. सांगितलेल्या श्रुतींना केवळ कर्म प्रतिषेध परत्व असल्यामुळे ज्ञानसमुच्चित कर्मांचा

मोक्षांत अन्वय आहे? असें शंकाकार 'हा केवळ'. काय हे वचन साक्षात् केवळ कर्मांच्या प्रतिषेधाला जाणवितात? किं-

वा अनुपपत्तीनें? पहिला पक्ष नाहीं असें सांगतात- 'नहि कारण'. दुसऱ्या पक्षाला दूषित करितात- 'न समुच्चयविधायी'.

समुच्चयाला प्रामाणिकत्व असतां कधी प्रतिषेधाला केवळ विषयत्व कल्पिलें जाईल अन्यथा संकोचक प्रमाणाचा अभाव

असल्यामुळे प्रतिषेधाला सर्व विषयत्व आहे. असा अर्थ. पुनः सकल आश्रमधर्मांचा ज्ञानाशी समुच्चय आहे? किंवा

उत्तम संन्यासाश्रम विहित धर्मांचा? असा विकल्प करून पहिल्या पक्षाचा निरास करितात- 'ज्ञानाच्या अंगत्वानें'

दुसऱ्या पक्षाचे उत्थापन करितो- 'संन्यासाश्रम'. त्यांना स्वरूपोपकारी अंगत्व संभवत असतां फलोपकारी अंगत्व क-

ल्पना उचित नाहीं. कारण विप्रकर्षाची = दूरान्वयाची प्रसक्ति होते असें सांगतात- 'नहि कारण सत्य धर्म'. सहावा प-

क्ष उत्थापन करितात- 'नित्यकर्मांच्या'. हा आक्षेपकर्त्याचा आक्षेप आहे? किंवा आरुढाचा? असा विकल्प करून प-

हिल्या पक्षाचा निरास करितात- 'नहि कारण नित्यकर्मांना'. दुसऱ्या पक्षाचा निरास करितात-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

नित्यकर्मांना फलनिरपेक्षत्व आहे, सापेक्षत्व असतां तर विश्वजिन्न्याय अवतीर्ण होतो. व संस्कार द्वारानेही. यांच्या विनियोग दाखविला आहे. कर्मांनाच विधींच्या अनुपपत्तीने मोक्षसाधनत्वाची कल्पना केली असल्यामुळेही समुच्चयाची असिद्धि आहे. ज्ञानाकडेही कदाचित् मोक्षसाधनत्व येईल (मग) असल्यामुळे न कर्मांच्या प्रतिषेधाची उदितहोमाच्या प्रतिषेधाप्रमाणे ज्ञानाच्या स्तुत्यर्थत्वाने उपपत्ति होत असल्यामुळे ज्ञान व कर्मांना विकल्पाने मोक्षसाधनत्व प्रसंग येतो.

॥ विवरणव्याख्यान ॥

'सापेक्षत्व असतां तर' "स स्वर्गः स्यात् सर्वान् प्रत्यविशिष्टत्वात्" [पू॰मी॰ ४।३।५।१५] अशा न्यायावरून विश्वजित् आदि श्रौत स्वर्गाच्या फलत्व कल्पनेप्रमाणे येथे ही स्वर्गाचाच फलत्व संभव असल्यामुळे (नित्यकर्मे) श्रुतीने मुक्तिफलत्व कल्पना करणे योग्य नाही असा अर्थ. पण विश्वजिन्न्यायाने स्वर्गाचा फलत्वाची कल्पना सिद्धान्ताच्या विरुद्ध आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'व संस्कार द्वारानेही'. या पक्षांत समुच्चयाची असिद्धीही आहे असे सांगतात- 'कर्मांनाच'. फलावाचून उत्पन्न न होणाऱ्या नित्यकर्मांच्या विधींच्या अनुपपत्तीने कर्मांना मुक्तिसाधनत्व तुम्हाकडून सांगितले जाते. व तसें असतां त्यांनाच मुक्तिसाधनत्वाची उपपत्ति होत असल्यामुळे समुच्चयाची सिद्धि होत नाही असा अर्थ. पण कर्म प्रतिषेधाने स्वयमेव ज्ञानाकडेच मुक्तीचे साधनत्व आहे. अशी आशंका असतां कदाचित् तेही (ज्ञानही) मोक्षसाधन होईल असें सांगतात- 'ज्ञानाकडेही' 'न कर्मणा' इत्यादिकाने कर्मांच्या प्रतिषेध असल्यामुळे समुच्चयाची असिद्धि आहे. अशी आशंका असतां प्रतिषेधाची दुसऱ्या रीतीने व्यवस्था सांगतात- 'कर्मांच्या प्रतिषेधाची' 'उदितहोमाच्या प्रतिषेधाप्रमाणे' याचा हा अर्थ- जशी "प्रातः प्रातरनृतं ते वदन्ति" अशी अनुदितहोमाची निंदा उदितहोमाच्या स्तुतीकरिता आहे. किंवा जशी 'अतिथये प्रद्रुताय शून्यायावसथाया ह्यर्यं हरन्ति तादृगेतत्' इत्यादिकाने उदितहोमाची निंदा अनुदितहोमाच्या स्तुतीकरिता आहे. त्याप्रमाणे कर्माच्या प्रतिषेध ज्ञानाच्या स्तुतीकरिता आहे असा. फलितार्थ दाखवितात- 'ज्ञान व कर्मांना' उदित अनुदितहोमाच्या विकल्पाप्रमाणे ज्ञान-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विवरण

१६४।२३

ब्रह्मज्ञानम् इतिकर्तव्यतेने कर्मांना मोक्षसाधनत्व कल्पित करितें? असें असेल तर नाही. कारण शमादिद्वारे इति
कर्तव्यें आहेत व विध्युद्देशांत प्रसिद्ध कर्मांचा करणतेने (वेदानुवचनेन हा) विधि ~~त्याच्यारी~~ इतिकर्तव्यतेशी विरुद्ध
२ (ध्.५।७।१ श्लोकविकल्प)
आहे. अर्थ ही (= साध्यही) विरुद्ध आहे. कर्मांचा साध्य अर्थ कोणता? हे सांगितले पाहिजे. ब्रह्मात्मैकत्व तर नाही कारण
त्याला असाध्यत्व आहे. अविद्येची, भेदांशाची, अध्यासाची व कर्मांची, निवृत्तीही नाही कारण "भिद्यते हृदय

॥ विवरणव्याख्यान ॥

६ ५१।१५

कर्मांनाही विकल्पाने मुक्तिसाधनत्व प्रसंग येत असल्यामुळे समुच्चय नाही. असा अर्थ सांगण्यापूर्वी उत्थापन करितात 'ब्रह्मज्ञानम्'
ब्रह्मज्ञान करणत्वामुळे इतिकर्तव्यतेची अपेक्षा करितें. दुसऱ्या इतिकर्तव्यतेचा निर्देश नसल्यामुळे कर्मे इतिकर्तव्यतेस
प्राप्त होतात असा अर्थ. "शान्तो दान्त उपरतस्तितिक्षुः समाहितः श्रद्धावित्तो भूत्वाऽऽत्मन्येवात्मानं पश्येत्" [बृ.४।४।२३]
अशा रीतीने शमादिकांच्या इतिकर्तव्यतेचा निर्देश असल्यामुळे परिशेषाची असिद्धि आहे असें सांगतात- 'नाही कारण' पुनः
'तमेतं वेदानुवचनेन' इत्यादिकांनी कर्मांचे ज्ञानकरणतेने अभिधान असल्यामुळे त्यांना इतिकर्तव्यतात्व विरुद्ध आहे असें
सांगतात- 'व विध्युद्देशांत' 'अग्निहोत्रं जुहुयात्' इत्यादि विध्युद्देशी तेथे सिद्ध कर्मांना जोडा (यजेत असा) करणतेने विधि
कर्मांना इतिकर्तव्यता नाही
त्याच्याशी इतिकर्तव्यतेचा विरोध असल्यामुळे ^ अशी योजना. प्रमाणाभावाचा विस्तार करून अर्थाभावाचा विस्तार करण्याकरिता
आरंभ करितात- 'अर्थही' निरपेक्ष कारण अशाही दोघे गुणांना एकमेकांपासून कार्यांतर जनकत्वी दिसत असल्यामुळे कर्म व ज्ञानांच्या
विरोध कसा? अशी आकांक्षा असतां सांगतात- 'कर्मांचा साध्य?' काय ब्रह्मात्मैकत्व कर्मांनी साधित केले जाते? किंवा अविद्ये-
ची निवृत्ति? किंवा भेदांशाची? किंवा मिथ्या ज्ञानाची? किंवा कर्मांची? किंवा उपाधिद्वयाची? असा 'कोणता' शब्दाचा
अर्थ. पहिल्याला दूषित करितात- 'ब्रह्मात्मैकत्व तर' प्रागभाववान् तर साध्य असते याला प्रागभावशून्यत्व असल्यामुळे साध्यत्व
नाही असा अर्थ. द्वितीय तृतीय चतुर्थ व पंचम विकल्पांचा निरास करितात- 'अविद्येची, भेदांशाची' पण ज्ञानाचा नि-
मात्र
वर्तकत्व ~~मात्र~~ येथे प्रसिद्ध होते. कर्माला नाही? अशी आकांक्षा असतां सांगतात —

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

ग्रन्थिः" [मुं. ३।२।८] "ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति" [मुं. ३।२।९] इत्यादिकांत त्यांना ब्रह्मदर्शन निवर्त्यत्व कळलें.
"तस्मिन्दृष्टे परावरे" [मुं. २।२।८] असें म्हटलें असतां तर कर्मे सहकारित्वांनी कळत नाहीत. उपाधिद्वयाची
(=स्थूलसूक्ष्म शरीराची) निवृत्ति ही कर्मांचें फळ नाही. कारण "तथाविद्वान्नामरूपाद्विमुक्तः" [मुं. ३।२।८] "
"एवमेवास्य परिद्रष्टुरिमाः षोडशकलाः पुरुषायणाः पुरुषं प्राप्यास्तं गच्छन्ति" [प्र. ६।५] अशा रीतीनें ही
(=शरीरद्वयाला)
त्याला ब्रह्मदर्शन निवर्त्यत्व कळतें. कर्मांच्या उपाधींना अज्ञानमात्राचें उपादानत्व पूर्वी ठरविलेंच ही आहे.
पुनः समुच्चयवाद्याला विज्ञानानें साध्य ही फळ नाही. कारण कर्मोपाधींना सत्यवस्तुत्वें विज्ञानानें अनि-

॥ विवरणव्याख्यान ॥

'तस्मिन्दृष्टे' म्हणणाऱ्या कल्पाला दूषित करितात- 'उपाधिद्वयाची' स्थूलसूक्ष्मशरीर उपाधिद्वय शब्दाचा अर्थ आहे.
गंगादि नद्यांना स्वतःच्या नामरूप परित्यागानें उदधि ऐक्य प्रमाणें आत्मस्वरूप ब्रह्मतत्त्व ही विद्यावानाचे पुढें
विनिवृत्तनामरूप ब्रह्मभावाला प्राप्त होतो असा प्रथम श्रुतीचा अर्थ. दुसऱ्या श्रुतीच्या विरोधाला सांगतात-
'एवमेवास्य' नद्यांना स्वतःच्या नामरूपाच्या परित्यागानें समुद्राची प्राप्ति 'एवं' शब्दाचा अर्थ आहे. पृथिवी आप तेज
वायु आकाश, प्राण, श्रद्धा इंद्रिय मन अन्न वीर्य तप मंत्र कर्म लोक नाम ह्या षोडशकला. पुरुष आहे अयन=आ
श्रय ज्यांच्या त्या पुरुषायण. कर्मांनी निवर्त्यत्वाच्या अभावाविषयी दुसरा हेतु सांगतात- 'कर्मांच्या उपाधींना'
श्रुतिवचनांच्या योगानें कर्मांच्या उपाधींना अज्ञानोपादानत्व साधलें असल्यामुळें व अज्ञानाला ज्ञानमात्रनिवर्त्यत्व असल्या-
मुळें दुसऱ्याकडून त्यांच्या निवृत्तीचा असंभव आहे असा अर्थ. अशा रीतीनें कर्मांच्या साध्याभावाला सांगून ज्ञानाच्या
साध्यभावाला सांगतात- 'पुनः समुच्चय' कर्मांच्या उपाधींची निवृत्ति विज्ञानानें का आहे? किंवा मिथ्या-
ज्ञानाची निवृत्ति? किंवा त्याच्या प्रवाहाची निवृत्ति? अथवा मिथ्याज्ञानाच्या संस्काराची? किंवा ब्रह्मात्मत्वें स्फुरण?
असा विकल्प करून पहिल्याचा निरास करितात- 'कारणकर्मोपाधींना' दुसऱ्याला दूषित करितात-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

वर्त्यत्व आहे. व मिथ्याअध्यासाचीही क्षणिकत्वाने स्वतःच निवृत्ति होईल. प्रवाहाचीही त्याची निवृत्ती वाढून पृथक् उच्छेदाचा अभाव आहे. व अवस्तुत्वही आहे. मिथ्याज्ञान संस्काराचा शुक्तिकादि तत्वज्ञानाशी अविरोध दिसत असल्यामुळे अनिवर्त्यत्व आहे. व ब्रह्मात्मभावाचीही स्वयंप्रकाशतेने विज्ञानाने अप्रकाश्यत्व आहे. तत्वज्ञानाच्या अभ्यास संस्कारापासून मिथ्या ज्ञानाच्या संस्काराची निवृत्ति असतां तत्वज्ञानापासून मुक्ति श्रुतीत विरोध येतो. म्हणून सर्वानर्थांचे उपादान अशा अनादि मिथ्याऽज्ञानाच्या निवृत्तीनेच विज्ञान फलवान् –

॥ विवरण व्याख्यान ॥

'मिथ्याध्यासस्यापि' ह्या आक्षेपाचा निरास करितात – 'प्रवाहरूपाहि', प्रवाहाने प्रवाहाइन भेदाने निरूपण करितां येत – नसल्यामुळे प्रवाहाची निवृत्ति असतां त्याची निवृत्ति होते असा अर्थ. पण केव्हां प्रवाहाची निवृत्ति युक्त नाही असें सांगतात – 'व अवस्तुत्वहि'. जरी क्षणिकत्वामुळे मिथ्याज्ञान स्वतःच नाश होईल. तथापि सजातीयाची उत्पत्ति दुर्वार असल्यामुळे मिथ्याज्ञानाचा अत्यंत उच्छेद ज्ञानसाध्य आहे? असें असेल तर नाही कारण हे विकल्पाला सहन करीत नाही – काय मिथ्याज्ञान सत् आहे? किंवा असत्? किंवा अनिर्वचनीय? पहिला पक्ष नाही कारण सत्यत्व असतां ज्ञाननिवर्त्यत्वाचा असंभव आहे. दुसराही नाही कारण तुच्छत्व असतां अपरोक्ष प्रसिद्धीची अनुपपत्ति आहे. तिसऱ्या पक्षीं मिथ्याज्ञानाला अविद्यात्मकत्वामुळे विद्यामात्र निवर्त्यत्व अंगीकार करणे योग्य आहे. असा अर्थ. चवथ्या कल्पाचा निरास करितात – 'मिथ्याज्ञानसंस्कारस्य', रज्ज्वादिकांचा साक्षात्कार झाला असतांही सर्पभयादि संस्कारामुळे भयकंपादिकांची अनुवृत्ति दिसत असल्यामुळे संस्काराचा ज्ञानाने उच्छेद्यत्व नाही असा अर्थ. पांचव्याचा निरास करितात – 'ब्रह्मात्मभावस्यापि', पण तत्वज्ञानाचा स्वरूपाने मिथ्याज्ञानसंस्काराशी अविरोध असतांही त्याच्या संस्कारस्वरूप संस्कार निवर्तकत्व आहे? यावर सांगतात – 'तत्वज्ञानाच्या', उक्त न्यायाने तुमच्या पक्षातही ज्ञान अनर्थक होईल? अशा आशंकेचा उपसंहार व्याजाने निरास करतात – 'म्हणून', अनादि अनिर्वाच्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

आहे. म्हणून समुच्चयाला अवकाश नाही.

येथें सर्वसंकरवादी ब्रह्मविचारावा अपेक्षित अधिकार ज्ञानें जाणून धर्म समुच्चय सामर्थ्यावरून च
धर्मावबोधाच्या अनंतर ब्रह्मावबोध आहे. अशी जल्पना करितो. तेथें समुच्चय असतांतर विपरीत क्रम असणार
नाही? हें निरूपणीय आहे तें असें – ज्ञानवान कडून च अनुष्ठित कर्में मोक्षाला साधतात. म्हणून ब्रह्मावबोधा
ला उत्पादन करून तद्वान् ब्रह्मचाऱ्याने धर्मविचारादि सर्व आश्रमधर्मांचें अनुष्ठान करणे युक्त आहे. असा वि-
विपरीतच क्रम होईल. अन्यथा पूर्वीच मुमुक्षु असलेल्याच्या धर्मविचाराच्या परिसमाप्तिपर्यंत अनुष्ठान केल्या

॥ विवरणव्याख्यान ॥

अज्ञान व त्याच्या कार्याची निवृत्ति तत्वज्ञानाचे फळ आहे. असा अर्थ. पण आमच्या मतांतही असेंच ज्ञानाचे फळ आहे! अशा शंकेला
निरसित करितात – 'म्हणून समुच्चय' ब्रह्मातिरिक्त सर्वांचा अविद्यात्मकत्व असल्यामुळे व अविद्यकाचे विद्याधाम नि-
वर्तकत्व असल्यामुळे कर्मांचा उपयोग नाही म्हणून समुच्चय नाही असा अर्थ.

"सर्वापेक्षा च यज्ञादिश्रुतेरश्ववत्" [ब्र.सू. ३।४।२६] येथें कर्मांना अपेक्षत्व सांगितले असल्यामुळे समुच्चय
तर प्रतीत होतो. तो तर यज्ञादिकांच्या परिचर्यावाचून अनुपपन्न आहे. म्हणून यज्ञादि विचार्य आहेत व त्यामुळे धर्ममी-
-मांसेच्या अनंतर ब्रह्ममीमांसा आहे? अशा भास्कराच्या अनुवाद करितात – 'येथें सर्वसंकरवादी'. अनुवाद समर्थांच्या शं-
-केचे अवस्तुत्व सांगतात – 'ब्रह्मविचारावा'. नित्यानित्य वस्तुविवेकादि मुळावाच ब्रह्मविचार संभवतो व त्याचा आश्रय
केला असतां धर्मावबोधाच्या आनंतर्य युक्त नाही. असा विभाग जाणत नाही! असा अर्थ. श्रुति स्मृति न्याय विरोधा-
-मुळे समुच्चय न तर असंभवी आहे. त्याचा अंगीकार करून दूषण सांगतात – 'तेथें समुच्चय तर'. वैपरीत्याचाच दाखवि-
तात – 'तें असें'. कर्मावबोधानंतर ब्रह्ममीमांसा या पक्षांत दूषण सांगतात – 'अन्यथा' 'पूर्वीच' – ब्रह्मचारी आश्र-
-मांतच असा अर्थ. काय धर्मनिश्चयाच्या पूर्वीच कर्माचें भोगफळ आहे? किंवा मोक्ष? पहिला पक्ष बरोबर नाही कारण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

जागान्यांकर्मांचा आनर्थक्य प्रसंग येतो. प्रथमाश्रमीच मुमुक्षु दिसतातही. सर्वसाधारणत्वामुळे धर्मविचारच प्रथम कर्तव्य आहे असें असलतर हें देवप्रिया, नाही हा (= मुमुक्षु) सर्वसाधारण करण्याकरितां प्रवृत्त झाले. परंतु काम्यमानाचें साधन किंवा अवश्य अनुष्ठेय सिद्ध करण्याकरितां प्रवृत्त आहे. तेथें जर विचारद्वय काम्यमान मोक्षसाधन असेल तर विपरीतक्रमच श्रेष्ठ आहे असें सांगितले. आता नित्य अध्ययनविधि कर्मविचाराला प्रयोजित आहे चो-म्हणून अवश्य अनुष्ठेय विचारानंतर काम्यमान ब्रह्मविचार प्रयोजित केला जातो? असें असेल तर यांत सार नाही कारण काम्यमान ब्रह्मविचारानंतरही नित्यकर्मविचाराची उपपत्ति होते. पण अध्ययनानंतर कर्मविचाराचें अ-

॥ विवरणव्याख्यान ॥

मुमुक्षुत्व आहे. मुमुक्षापर्यंतही काय कर्मांना साक्षात् मुक्तिसाधनत्व आहे? किंवा अपूर्वद्वारानें? पहिला पक्ष नाही कारण त्या-अवस्थेत ज्ञानाच्या अभावानें समुच्चयाचा असंभव आहे. मुमुक्षापर्यंत तर जन्मान्तरीय कर्मांनाही अपूर्वद्वारा उपकारकत्व संभवत असल्यामुळे यानन्तर कर्मानें बाधा होत नाही असा अर्थ. पण पूर्वी (ब्रह्मचर्याश्रमांत) मुमुक्षु नसतात? त्यावर सांगतात - 'प्रथमाश्रमीच'. श्रुतिस्मृतिवेदांत असा दोष. धर्मविचाराच्या प्राथमिकत्वाविषयीं मुमुक्षुहेतूची शंका घेतो - 'सर्वसाधारणत्वामुळे'. मुमुक्षु अमुमुक्षु विषयत्वामुळे धर्मविचाराचा प्राथम्य आहे असा अर्थ. उपहासयुक्त उत्तर सांगतात - 'देवप्रिया', हे पशो असा अर्थ. सांगतात - 'नाही हा'. पुढें काय? असें असेल तर सांगितले पाहिजे कीं - काय धर्मविचाराला ब्रह्मविचाराप्रमाणे मुक्तिसाधनतेनें अनुष्ठेयत्व आहे? किंवा नित्यतेने? त्यांत पहिल्या पक्षांत दूषण सांगितले आहे असें सांगतात - 'तेथें जर'. दुसऱ्या पक्षाचा अनुवाद करितो - 'आतां नित्य अध्ययनविधि'. त्याचें सिद्धान्त उत्तर सांगतात - 'यांत सार नाही' स्वाध्यायग्रहण करून शंका घेतो - 'पण अध्ययनानंतर'. कर्मविचारपूर्वक कर्मांचें अनुष्ठान न केल्यास प्रत्यवाय प्राप्त होईल त्याच्या निरासाकरितां प्रथम कर्मविचार आहे. असा अर्थ. प्रत्यवायाच्या प्राप्तीचा अंगीकार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

(परंतु)

-नुष्ठान असतां प्रत्यवाय होईल? म्हणून नित्याप्रमाणे अरण्याचे अनुष्ठान असतांही प्रत्यवायाचा परिहार हो-
तेवढ्याचेंच ग्रहण करावे कारण

- ईड - पुनः विद्वानांनी अनुष्ठीयमान ब्रह्मचारीधर्मांनाही मोक्षसाधनत्वाचा लाभ होतो असल्यामुळे तेवढ्या-
(गृहस्थाचे)
तेच ग्रहण करावे. कारण वेदानुवचनेन इत्यादिकांत प्रत्येकाचा निरपेक्ष करण विभक्तीने श्रवण आहे आ-

श्रमकर्मांनातर विकल्पाने मोक्षसाधनत्वाची उपपत्ति होते. ब्रह्मचर्यापासूनच संन्यासाचे विधान हो आहे.

धर्माविषयी नित्यत्वाने अनुष्ठित सर्व ब्रह्मविचाराचे हेतु नाहीत. धर्मविचार अनुष्ठेय नाही आहे. कारण अग्निहोत्रा-

॥ विवरणव्याख्यान ॥

करितात- 'स्वरे' मग कर्मविचाराचा प्राधान्य प्राप्त झाले? अशी आशंका असतां सांगतात- 'परं पुनरिमां-

प्रमाणे', अल्प अल्प धर्मविचार करून प्राधान्याने ब्रह्मविचारच करो. असा अर्थ. पुनः काय कांही आश्रमधर्मांच्या
वनाही असे सांगतात- 'पुनः तेवढ्याचेंच'.

समुच्चय आहे किंवा सकल आश्रमधर्मांचा? पहिल्या पक्षी व्याख्या वाचून समुच्चय याची आशंका होईल तेव्हा त्या-
अर्थी. मग अग्निहोत्रादि कर्मांना अननुष्ठेयत्व प्राप्त झाले? त्यावर सांगतात- 'कारण
ग्न्यादि अनुष्ठेयत्वाचा आश्रय करावा असे 'पुनः विद्वानांनी' त्याविषयी हेतु सांगतात- 'कारण वेदा-

नुवचनेन', दुसऱ्या विकल्पात्मक निराम झाला असे जाणावे. मग अग्निहोत्रादि धर्मांना वैयर्थ्य प्राप्त होते?

त्यावर सांगतात- 'आश्रमधर्मांना'. ~~विकल्पाने चित्ताच्या शुद्धि झाल्याने~~ याहे कारणामुळे सकल आश्रमधर्मांचा

समुच्चय युक्त नाही असे सांगतात 'ब्रह्मचर्यापासूनच'. एकाजन्मांत अनुष्ठित सकल आश्रमधर्मांच्या ज्ञाना-

शी समुच्चय असतां ब्रह्मचर्यापासूनच संन्यास विधान अयुक्त होते असा अर्थ. विपरीत मत कोणतांची धर्म-

विचारास कारण हे श्रवणादिकांत प्रवृत्तीची अनुपपत्ति असल्यामुळे त्यांना ब्रह्मविचारांत अप्रयोजकत्व आहे.

असे सांगतात- 'धर्मावबोध' धर्मविचाराचे नित्यत्वाने अनुष्ठेयत्व अंगीकार करून ब्रह्मविचारांत त्याचे प्रयोजकत्व-

निरसितात. सांप्रत अग्निहोत्रादि परित्याग करितात- 'धर्मविचार'. मग समुच्चय कसा? त्यावर सांगतात- 'कारण

'अग्निहोत्रादि'. पुनः ब्रह्मविचाराही कर्मविचाराप्रमाणे नित्य अध्ययनविधीने प्रयोजक होतो. किंवा दुसऱ्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

– हि संन्यासधर्माचाही ग्रन्थांत समुच्चय अंगीकार केला आहे. पुन: अध्ययनविधि कर्मविचाराला प्रयोजित करणारा ब्रह्मविचाराला कां प्रयोजित करीत नाही हें सांगितलें पाहिजे? "श्रोतव्य:" या विध्यन्तश्रुत्या श्रवणामुळें असें असेल तर तूं अश्रुत मीमांसा वृत्तान्त दिसतो. कारण धर्मविचारांत कल्पित प्रवर्तकभाव असा यत्न अध्ययनविधीनें ब्रह्मविचाराचाही प्रयोग संभवत असतां "श्रोतव्य:" अशा विधीला विनियोग, अधिकार, प्रयोग विधिकल्पनेनें प्रवर्तकत्व कल्पनेचा अयोग आहे. पण ब्रह्मज्ञानाला काम्यमानाच्या साधनतेनें त्याच्या विचाराला काम्यत्व असल्यामुळें नित्याध्ययनविधि प्रयुक्त नाहीं? असें असेल तर कर्मविचारांत काम्यमान कर्मवाक्यविचाराला ही त्याचे अप्रयुक्तत्व प्रसंग येतो.

॥ विवरणव्याख्यान ॥

विधीनें असा विकल्प करून पहिल्याशीं निरास करीतात – 'पुन: अध्ययनविधि', ब्रह्मविचाराला नित्याध्ययनविधि प्रयोजकत्व असतां कर्मविचारा प्रमाणें अविशेषामुळें प्राथम्य येईल असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचें उत्थापन करीतात – 'श्रोतव्य: या.' कल्पना गौरव प्रसंगामुळें विध्यन्तराला प्रवर्तकत्व अनुपपन्न आहे असें सांगतात – 'तूं अश्रुत'. विधीचा प्रवर्तकत्व प्रसिद्ध असल्यामुळें व श्रवणांत विधीचें श्रवण असल्यामुळें कल्पना गौरव प्रसंग कसा? अशी आशंका असतां सांगतात – 'विनियोग:' प्रयोग विधीला प्रवर्तकत्व असल्यामुळें व श्रवणांत विनियोग, प्रयोग, अधिकार विधींना कल्पत्व असल्यामुळें व अध्ययन विधीला विनियोगादि कल्पनेनें कर्मविचारांत प्रवर्तकत्व कल्पित केलें असल्यामुळें श्रवणविधीनें प्रयुक्ति नाही असा अर्थ. पण नित्यानित्य संयोग विरोधामुळें ब्रह्मविचाराला अध्ययनविधीनें प्रयुक्ति नाही? अशी शंका घेतो – 'पण ब्रह्मज्ञानाला'. कारण तसें असतां नित्य विधिप्रयुक्तत्वामुळें आवश्यकत्व व काम्य विचारत्वामुळें अनावश्यकत्व असा विरोध येतो असा अर्थ. अतिप्रसंगानें उत्तर सांगतात – 'असें असेल तर कर्मविचारांत'. विचाराला काम्यत्वानें नित्यविधीनें प्रयोग नसतां काम्य ज्योतिष्टोमादि वाक्यविचाराला ही नित्यविधि प्रयुक्तत्व येणार नाही. याला ही दोष येईल असा अर्थ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

१६६।१८

'इदं' असो पण वैराग्य शम दम उपसदनादि साधनविशेषांचे ब्रह्मविचाराच्या अंगत्वाने विधान असल्यामुळे
ब्रह्मविचारांत शम, दमादि अंगशून्य अध्ययनविधीला ब्रह्मविचारांत त्या अंगांच्या आक्षेपकत्वाची अनुपपत्ति असल्या-
मुळे साङ्ग दुसरा (=श्रोतव्यः) विधि कल्पिल्या जातो. 'तो हातू' अज्ञात विधि व्यापार आतंवला आहेस. अध्ययनविधि
तर शिरोव्रत भूभोजनादि अंग विकल असल्या वाक्यान्तराच्या अध्ययनाचे विधान करणारा शिरोव्रतादि अंगाक्षेपपु-
रःसर मुंडक कालीयादिकांच्या अध्ययनाचे विधान करितो. विचारालाही प्रयोजित करणारा प्रसिद्धवपान इष्टेनै-
न्द्र अगाधुत न्यायपदांचा आक्षेप करीत नय विचाराला प्रयोजित करितो. नित्याधिकार दर्शपूर्णमास विधीसी यथा-

विवरणव्याख्यान

प्रकारान्तराने ब्रह्मविचाराच्या अध्ययन विधिप्रयुक्तीवर आक्षेप घेतो 'इदं असो पण' अध्ययनविधीला
कर्मविचारांत शमादिकांच्या आक्षेपकत्वाचा कल्पितत्व नसल्यामुळे ब्रह्मविचारात्यातर शमादिकांवाचून अयोग्य अ-
सल्यामुळे सांग दुसरा विधि प्रवर्तक आवश्यक करणे योग्य आहे. असा अर्थ. 'पण' कर्मविचारांत अध्ययन विधीचा शमादि अं-
गांचे आक्षेपकत्व नसले तरी ब्रह्मविचारांत प्रापकत्व कां असणार नाही? असें समाधान करितात 'तो हातू' अज्ञात विधि-
व्यापारत्वाला यसांगतात 'अध्ययनविधि तर' शिरोव्रत = शिरावर अंगार पात्र धारण. ज्याला ज्याच्या प्रयुक्तीकरिता ज्या
अंगांची अपेक्षा असते. त्याला त्याच्याहून अन्याच्या प्रयुक्तीकरिता त्या अंगाची अपेक्षा नसते याविषयीं दुसरे उदाहरण सां-
गतात 'विचारालाही प्रयोजित करणारा' अध्ययनविधि असा शेष 'इष्टतेनं' = इष्टफल रूप निर्णयाचा उपकार द्वार-
ने असा अर्थ. त्याविषयीं दुसरा दृष्टान्त सांगतात 'नित्याधिकार' यावज्जीववाक्यांत होणाऱ्या अवश्यकर्तव्यता उप-
लब्ध होते. असें असता कोणत्या अंगाच्या वैकल्याने प्रधानाची असिद्धि होत असतां प्रधानबाध निरुद्ध होते. म्हणून-
नित्यविधि यथाशक्ति अंगाच्या उपसंहाराने प्रधानाचे अनुष्ठापन करवितो. काम्यविधि तर विपरीत आहे. कारण यथाश-
क्ति अंगाच्या अनुष्ठानांत प्रमाणाचा अभाव आहे. प्रधानवाक्याने तर सकलांग संपत्तींत अनुष्ठान असतांही अविरोध.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

इति अंगानुष्ठानाला प्रयोजककरितो. कामाधिकार (विधि) तर सर्वांगांच्या अनुष्ठानाला. तसे तो यविधि दर्श-
पूर्णमास कर्मांत आज्यावेक्षणादि अंगाला आक्षेपित करतो. यागान्तरांत अवघातादि अंगाला. याप्रमाणे अध्ययनवि-
धि विचारांत शमादि अंगांना आक्षेपित करील इतरत्र नाही. हे विरुद्ध येत नाही. पण अधिकारि विशेषणतेने शमा-
दिकांना अनुपादेयत्व (अनुष्ठीयमानत्व) असल्यामुळे त्यांचा आक्षेप नाही. कारण अध्ययनविधीच्या अधिकाराभावाच त्याने
प्रयुक्त विचारांतही अधिकारित्व आहे. म्हणून प्रधानविधि दृष्टादृष्ट अंगाच्या उपकारविशेषाच्या अपेक्षेने जेथे कोणी

॥ विवरणव्याख्यान ॥

असा अर्थ. हे सर्व व्याख्यात्याला सांगतात — 'तसे तोच विधि' = दर्शपूर्णमास विधि असा अर्थ. उपांशुयाजाला आज्य हविष्क-
त्व असल्यामुळे त्याच्या अवेक्षण पर्यग्निकरणादि संस्काराला दर्शपूर्णमास विधि आक्षेपित करतो. आग्नेय व अग्नीषोमी-
याला पुरोडाश हविष्कत्व असल्यामुळे त्याच्या प्रकृति अशा व्रीह्यादिकांत अवघातादि अंगांना आक्षेपित करतो असा
अर्थ. दृष्टान्तांत सांगितलेल्या अर्थाला दार्ष्टान्तिकांत समर्थन करितात — 'याप्रमाणे'. पण अध्ययनविधीला शमादिकांचे
आक्षेपकत्व अयुक्त आहे. कारण अधिकारिविशेषणत्वाने शमादिकांना अनुपादेयत्व आहे व उपादेयत्वाचा विधीकडून
अनुष्ठेयत्व नियम आहे अशी शंका घेतात — 'पण अधिकारिविशेषणतेने'. अनुपादेयत्व = असाध्यत्व असा अर्थ. उत्तर
सांगतात 'असे होत नाही'. विचाराच्या अध्ययनविधिप्रयुक्तत्वाला जो अंगीकार करितो तो अध्ययनविधीच्या अधिकारा-
चे विचाराच्या अधिकाराप्रत अंगीकार करितो. म्हणून शमादिकांना अधिकारिविशेषणत्व नाही असा अर्थ. पण "शा-
न्तो दान्त" [बृ. ४।४।२३] इत्यादि वाक्याच्या पर्यालोचनेने आत्मविचाराधिकाराला शान्त्यादि गुणकत्व प्रतीत होत असल्या-
मुळे इतरत्र अधिकार नसतो असे असेल तर नाही. कारण "आत्मन्येवात्मानं पश्येत्" [बृ. ४।४।२३] असा अनुवाद करून
शान्त्यादि गुणक असा विधि मानला असल्यामुळे उक्त दोष प्रसक्ति येत नाही असे अभिसंधान करून उपसंहार
करितात — 'म्हणून' "दृष्टादृष्ट अंगांच्या" = दृष्टादृष्ट सातिशय हेतु अंगाच्या असा अर्थ. प्रकृत विचाराला अध्ययन-

-ऽनुष्ठानापेक्षम् । निःश्रेयसफलं तु ब्रह्मविज्ञानम् । न चानुष्ठाना

॥ व्याख्यान ॥

(मागाहून १७१ पृष्ठावरून) ६१।२८

^अनुष्ठानाची अपेक्षा करणारे आहे. धर्मज्ञानाचे अभ्युदय फळ आहे असें प्रसिद्ध आहे. त्या विषयीं कोणाचा विवाद नाहीं. तेंही ज्ञानाचे फळ नाही परंतु ज्ञेयाचे = धर्माचे आहे. त्याचेही ज्ञा-

६२।१ ६२।१

यत्वामुळे फळ नाही परंतु अनुष्ठीयमानत्वामुळे आहे. असा अर्थ. 'निःश्रेयसफलं तु' मोक्षज्याचे फळ आहे असें तर 'ब्रह्मविज्ञानम्' = ब्रह्माचें विज्ञान आहे. 'न चानुष्ठा

६२।१

नान्तरापेक्षम्' = त्याला तर दुसऱ्या अन्य अनुष्ठानाची अपेक्षा नाही. ब्रह्मज्ञानाचे फळ

६२।२

मोक्ष तर नित्यसिद्ध अव्यवहित व स्वसंवेद्य आहे. कारण अविद्या संसाराचे हेतु आहे.

॥ विवरण ॥

जे

१६७।४

जे किंचित् अंग असेल त्याला प्रयोजित करिते. असें हें सर्वत्र ज्ञात झालेले आहे. म्हणून विचार करावा. एकाध्ययनविधि प्रयु-

क्तत्व असल्यामुळे अपेक्षा असतां ब्रह्मविचाराच्या अनंतर धर्मविचार युक्त आहे. कारण विचारादिकांनाही मोक्षसा

१६८।६

धनाचा लाभ होतो. म्हणून फळ करूनही धर्मजिज्ञासेच्या अनंतर ब्रह्मजिज्ञासा नाही - असा.

तै. दी. [illegible] ५ [illegible] ५१०।३ तै. दी.

पण मोक्षालाही फलत्व असतां अभ्युदयाहून किंचित अंतर नाही? अशी आशंका असतां सांगतात - 'ब्रह्मज्ञानाचे फळ'

॥ विवरणव्याख्यान ॥

-नीविधिप्रयुक्तांच्या समर्थनाचे फळ सांगतात - 'म्हणून विचार करावा'. अध्ययनविधि प्रयुक्तांत अनुपपत्तीचा अभाव अ-

सल्यामुळे 'असा' 'म्हणून' या शब्दाचा अर्थ. युक्तत्वभाव सांगतात - 'कारण विचारादिकांनाही' फळ करूनही प्रसंभावितत्व अस-

ल्यामुळे व प्रमाणरहितत्व असल्यामुळे धर्मजिज्ञासेच्या अनंतर ब्रह्मजिज्ञासा आहे असें सांगितले त्याचा उपसंहार करितात -

१।१४।२।१।१

'म्हणून फळ केल्यावरूनही' 'असा' याचा 'येथें हा आशय' याच्याशीं संबंध. 'पण मोक्षालाही' येथून 'प्रति वाक्य-

~~[illegible] आहे~~

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

न्तरापेक्षम् । भव्यश्च धर्मो जिज्ञास्यो न ज्ञानकालेऽस्ति, पुरुषव्यापार-

॥ व्याख्यान ॥ ६२।३

व अविवेक निवृत्त न करीत विघ्न उरस्थल प्राप्त होत नाही. म्हणून अशा रीतीने अत्यंत विलक्षण-त्वामुळे व प्रस्थानभेदामुळेही फलद्वाराने एकत्र त्यांची प्राप्ति नाही. त्याने तंत्र द्वयाच्या क्रमाची आकांक्षा नाही. जिज्ञास्य पुनः अत्यंत विलक्षण आहे असें सांगतात- 'च' = तसें. 'भव्यः धर्मः' = कार्य असा धर्म 'जिज्ञास्यः' = प्रथम तंत्रांत जिज्ञासेचा = विचाराचा विषय आहे. 'न ज्ञान-कालेऽस्ति' = कारण तो ज्ञान कालीन नसतो. मग तुच्छ आहे? नाही असें सांगतात- 'पुरुषव्या-पार तंत्रत्वात्' = कारण तो पुरुषाच्या व्यापाराच्या अनुष्ठानाच्या स्वाधीन आहे. अनुष्ठाना-

॥ विवरण ॥

'नित्यसिद्ध' याने उत्पाद्यत्व वगैरे कार्यत्व यांचा निरास केला आहे. 'अव्यवहित' याने आप्यत्वाचा प्रतिषेध केला आहे. स्वरूपाने आप्यत्व असले तरी स्फुरणविशिष्टतेने आप्यत्व आहे ? यावर नाही असें सांगतात- 'स्वसंवेद्य'. या विशेषणाने गुणाधान लक्षण संस्काराचा निरास केला. दोषापहरण परमार्थत्व असतां ज्ञान निवर्त्यत्वाचा असंभव असल्यामुळे त्याची निवृत्तिलक्षण संस्कारही नाही असें जाणावे. पण मोक्षाला एवंरूपत्व असतां संस्काराच्या प्रसिद्धीचा अस्त होईल तसें श्रवणादिकांचे वैयर्थ्य ही येते? यावर सांगतात- 'कारण अविद्या'. वस्तुतः एवंरूप-त्व असतां अविद्येने अन्यथा भान आहे असा अर्थ. म्हणून साधन वैयर्थ्यही नाही असें सांगतात- 'व अविवेक' 'प्रस्थानभेदामुळेही' = साधनें भिन्न असल्यामुळे हे असा अर्थ. 'एकत्र त्यांची प्राप्ति नाही' = जिज्ञासा द्वयाची एका कर्त्यांत कर्तृत्वाने प्राप्ति नाही असा अर्थ. 'कार्य' = भवति असा भव्यः, भविता जो पुढें होतो तो भव्य कार्य साध्य असा अर्थ. चंद्र-मंडलोदयाहून वैलक्षण्य सांगतात- 'पुरुषाच्या व्यापाराच्या'. पण कार्य शब्दार्थ ही अशा प्रकारचा (~~नित्यसिद्ध~~) सिद्ध (~~तुच्छ असत्~~) आहे? त्या-वर सांगतात- 'अनुष्ठानाधीनत्वामुळे ज्ञानकाली त्याचे असत्त्व आहे'.

न. दी. ५१०।१६

॥ विवरण व्याख्यान ॥

'प्रस्थान भेदामुळे' याच्या पूर्वी पर्यंत ग्रंथ स्पष्टार्थ आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तंत्रत्वात् । इह तु भूतं ब्रह्म जिज्ञास्यम्, नित्यत्वान्न पुरुषव्यापारतंत्रम्
। चोदना प्रवृत्ति भेदाच्च ।

॥ व्याख्यान ॥
र. प्र. ७५।१३

धीन त्यामुळे ज्ञान काळी त्याचे असत्त्व आहे तुच्छत्वामुळे नाही असा अर्थ. धर्माहून ब्रह्माचे वैल-
क्षण्य सांगतात - 'इह तु' = येथें उत्तरतंत्रांत तर 'भूतं ब्रह्म जिज्ञास्यम्' = सिद्ध ब्रह्म जिज्ञा-
स्य आहे 'नित्यत्वात्' = कारण त्याला नित्यत्व आहे 'न पुरुषव्यापारतंत्रम्' = त्यामुळे-
च ते पुरुषाच्या व्यापाराच्या आधीन नाही (पूर्वोत्तर तंत्रांत वेदार्थ रूपाने जरी जिज्ञास्यैक्य
असले तरी धर्म व ब्रह्म यांत स्वरूपतः अत्यंत वैलक्षण्य असल्यामुळे धर्म ब्रह्म साध्याधीन प्रवृत्त आ श्रा
त्यांच्यांत जिज्ञास्यैक्य नाही असा अर्थ) जिज्ञास्यांत स्वरूपतः भेद सांगून प्रमाणतः भेद सांगतात -
'च' = पुनः 'चोदनाप्रवृत्ति भेदात्' = वेदवाक्यांच्या प्रवृत्तींत = बोधकतेंत भेद असल्यामुळे ६२।८
जिज्ञास्यांत भेद आहे असा अर्थ. अज्ञातज्ञापक वेदवाक्य येथें चोदना शब्दाचा अर्थ आहे. हें दुसरे

॥ विवरण ॥

किंवा १६७।७ चोदनाप्रवृत्ति भेदात
~~प्रति~~वाक्य तात्पर्य भेदामुळेसुद्धा प्रमेय भेदाची सिद्धि आहे. या विषयीं दुसरा हेतु ते सांगतात - '~~जिज्ञास्यांत स्वरूपतः~~'.
१६७।८
'~~येथें~~ = ~~चोदनाप्रवृत्तिभेदाच्च~~' ~~या भाष्यांत~~. या भाष्यार्थाचे विवरण करितात - 'हें दुसरे प्रमाणान्या उपाधीने'

॥ विवरणव्याख्यान ॥

(पृ. ५१।५)

~~वाक्यापूर्वी~~
~~तात्पर्य भेदामुळे~~ ... पर्यंत गुंथ स्पष्ट आहे. पूर्वी (जसें चारही लक्षणांनी एक धर्म जिज्ञास्य आहे, येथे) सांगितले त्या जि-
ज्ञास्यैक्याचा 'भवत्य' येथें जो निरास सांगितला त्याचे तात्पर्य सांगतात - 'प्रतिवाक्य' प्रतितंत्र असा अर्थ. उपक्रमादि-
~~पर्यालोचनेने~~ ५२।२२
~~प्रति~~...ने पूर्वतंत्रांत धर्माचा जिज्ञास्यत्व असून उत्तरतंत्रांत ब्रह्माचा आहे असे प्रतीत होते असा अर्थ. 'हें दुसरे' येथें ही
या ... भाष्यांत ..., मा
दुसरा हेतू या उपन्यासें केला जातो? अशी शंका येऊन तिचा निरास करितात - 'या भाष्यार्थाचे' किंवा 'चोदनाप्रवृत्ति भेदात'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ व्याख्यान॥

प्रमाणाच्या उपाधीने प्रमेयाचे वैलक्षण्य आहे. धर्मचोदना तर (क्रियेचे प्रवर्तक वाक्य तर) पुरुषाला प्रेरित करणारी विषयाचे ज्ञान नसतां प्रेरित करण्याकरिता असमर्थ असलेली विषयालाही बोधित करिते. (स्वविषयांत प्रेरित करीत व बोधित करीते) असून (चोदना) प्रमाणान्तर केवळ बोधितच करितें. अवबोधांत पुरुष प्रेरित केल्या जात नाही, कारण अवबोध ६३९

॥ विवरण॥

१६५।८

(धर्म) चोदना येथील चोदना शब्दाने शब्दभावना (प्रेरणा करणारा शब्द) सांगितल्या जातो. तो तर चोदना अंशत्रयाने विशिष्ट अशा अर्थभावनेला करणारी. त्याचे (त्या अर्थभावनेच्या साध्य अशा विषयाचे) ज्ञान झाले नसतां पुरुषाच्या प्रवृत्तीचा असंभव असल्यामुळे अर्थभावनेलाही (अर्थभावनारूप भाव्य विषयालाही) प्रतिपादन करिते असा भाव. पण भाव्य ब्रह्मावबोधांत पुरुषाला प्रवृत्त करणारी (ब्रह्म) चोदना अवबोध विशेषित भाव्याला प्रतिपादन करिते यावर नाही असें सांगतात- 'अवबोधांत' पण अवबोध पुरुषप्रयत्नाने साध्य आहे नाही असें सांगतात- कारण- 'अवबोध'.

॥ विवरणव्याख्यान॥

प्रमाणांत वैलक्षण्य सांगितले प्रमेयांत नाही, या शंकेला निरास करितात- 'प्रमाणाख्यायाचे'. 'ब्रह्मचोदना' येथील चोदना शब्दाने प्रमाणपरत्वाने व्याख्यानकारांनी व्याख्यान केले असल्यामुळे येथेही (धर्मांतही) प्रमाणमात्र सांगितले जाते, अशी आशंका असतां त्यावर सांगतात- '(धर्म) चोदना येथेही'. ५२।१२ प्रमाण भावनेचा आलंबन असल्यामुळे चोदनाशब्द प्रमाणपर आहे. येथे तर स्वातंत्र्याने प्रेरकत्व असल्यामुळे असे नाही असा अर्थ. पण पुरुषाला स्वातंत्र्य असल्यामुळे चोदनेचे प्रेरकत्व कसे सांगितले? त्यावर सांगतात- 'तो तर'. जरी पुरुष स्वतंत्र आहे तरी अर्थभावनेला फलप्राधान्य असल्यामुळे धात्वर्थविषयक प्रवृत्ति युक्त आहे असा अर्थ. ५२।६ ५२।१३ पण प्रमाणत्वाच्या अभिप्रायामुळे ब्रह्मचोदनेचाही प्रेरकत्व आहे? इतरथा धर्मचोदनेचाही ते प्रकार नाही अशी शंका घेतो- 'पण भाव्य'. अवबोधाला भावनाविषयत्व सिद्ध नाही की ज्याने अवबोध (विशेषित) भाव्याला प्रतिपादन शक्ति असें सांगतात- 'यावर नाही' पण प्रागभावत्वामुळे त्याप्रमाणे अवबोधाचाही भाव्यत्व आहे अशी शंका घेतात- 'पण अवबोध', त्याचे उत्तर सांगतात- 'नाही असें'.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याहि चोदना धर्मस्य लक्षणं सा स्वविषये नियुञ्जानाएव पुरुषमे-

॥ व्याख्यान ॥

वस्तूच्या अनुसार व प्रमाणाच्या अनुसार उत्पन्न होते. ते पुरुषाच्या इच्छेला ही अनुसरत नाही. तेव्हां तेथें (पुरुष) कसा प्रेरित केला जाईल? जसें इंद्रिय व अर्थाचा सन्निकर्ष असतां त्या सन्निकर्षाने इन्द्रियांनीं कळणाऱ्या अर्थज्ञानांत पुरुष नियोजित केला जात नाही; त्याप्रमाणें. कारण इच्छा नसतांनाही ते स्वतः उत्पन्न होते. असेंच तर नित्यसिद्धत्वामुळे प्रेरणा संभवत नाही. (त्यामुळे) भाष्यांत 'ब्रह्मचोदना' येथें चोदना शब्द प्रमाणविवक्षेनें प्रयुक्त आहे. प्रेरणाविवक्षेनें नाही. ते हें सांगतात- 'याहि' 'हि' = निश्चयें करून 'या' = जी 'चोदना' = प्रवर्तक श्रुतिवाक्य. 'धर्मस्य लक्षणम्' = धर्माचे प्रमाण आहे. 'सा स्वविषये' = ती स्वविषयांत = धर्मांत 'नियुञ्जानाएव' = नियोजित = प्रेरित करीतच 'पुरुषम्' = पुरुषाला 'अवबोधयति' = जाणवितें.

॥ विवरण ॥

१६०।३
कारण इच्छा नसणाऱ्यासही व प्रयत्न न करणाऱ्यासही दुर्गंधादिकांचे ज्ञान दिसते असा अर्थ. '<u>धर्मांत</u>' = भाट्ट मतानें
ए.प्र ७६।१२
यागादिकरणक स्वर्गादिफलक भावना (प्रवृत्ति) रूपांत, प्राभाकर मतानें, फलहेतु यागादिगोचर (विषयक) नियोगांत, (विवरण) मतानें हितसाधन यागादिकांत, पुरुषाला प्रवृत्त करीतच "स्वर्गकामो यजेत" इत्यादि वाक्य बोधित करितें. असा अर्थ. "अयमात्मा ब्रह्म" इत्यादि वाक्य तर त्याच्यानें केवळ अप्रपंच ब्रह्मरूपानें बोधित करितें. प्रवृत्त करीत नाही.

॥ विवरणव्याख्यान ॥

५२१।२०
व्याख्यानांत अपेक्षित हेतूला सांगतात- '<u>कारण इच्छा नसणाऱ्यासही</u>'. म्हणून तसा प्रयत्नशून्य असतो असें सांगतात- '<u>प्रयत्न न करणाऱ्यासही</u>'. मतभेदाचे विषयाच्या (धर्माच्या) भेदाला सांगतात- '<u>भाट्ट मतानें</u>'. पण ब्रह्मवाक्य पुरुषाला कशामुळे प्रेरित करीत नाही? अशी आशंका असतां सांगतात—

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वबोधयति । ब्रह्मचोदनातु पुरुषमवबोधयत्येव केवलम्, अवबोधस्य चोदनाऽजन्यत्वान्न पुरुषोऽवबोधे नियुज्यते । यथाऽक्षार्थसन्निकर्षेण

॥ व्याख्यान ॥

'ब्रह्मचोदनातु' = ब्रह्मबोधकवाक्यतर 'पुरुषमवबोधयत्येव केवलम्' = पुरुषाला केवळ (प्रेरित करीत नाही) कारण अवबोधित करीते. 'अवबोधस्य चोदना अजन्यत्वात्' = अवबोधाचा ब्रह्मप्रमाणवाक्याकडून प्रवर्तकद्वाराने जन्यत्व नसल्यामुळे 'पुरुषो अवबोधे न नियुज्यते' = पुरुष अवबोधांत प्रेरित केल्या जात नाही. 'यथा अक्षार्थ सन्निकर्षेण' = जसे इन्द्रिय व विषयाच्या सन्निकर्षाने 'अर्थावबोधे तद्वत्' = उत्पन्न होणाऱ्या अर्थावबोधांत (पुरुष नियोजित केल्या जात नाही) त्याप्रमाणे. प.पा.८२।१८ म्हणुन अवशिष्टीन तंत्र द्यावा। जिज्ञास्याच्या (विधामुळे [illegible]) हे क्रमाची अपेक्षा नाही. कीं ज्याने त्याच्या अपेक्षेने अथ शब्दाचे व्याख्यान केल्या जाईल.

॥ विवरण ॥ र.प्र.७४।६

कारण विषयाचा अभाव आहे असे सांगतात - 'ब्रह्मबोधकवाक्यतर'. पण अवबोधच विषय आहे? त्यावर सांगतात - 'पुरुष अवबोधांत'. ब्रह्मचोदनेने पुरुष अवबोधांत प्रेरित केल्या जात नाही याविषयीं पूर्ववाक्याने हेतु सांगतात - 'अवबोधाला'. स्वजन्य ज्ञानांत स्वतः प्रमाणाचा प्रवर्तकत्व नाही याविषयीं दृष्टान्ताला सांगतात - 'जसे इन्द्रिय व विषयाच्या'. बोध प्रमाणापासून उत्पन्न होत असल्यामुळे व उत्पन्नांत विधीचा अयोग असल्यामुळे वाक्याचे ज्ञाना-

॥ विवरणव्याख्यान ॥ र.प्र. पृ.७६।१८

'कारणविषयाच्या अभावामुळे' = पुरुषप्रवृत्तीच्या विषयाचा अभाव असा अर्थ. जसा धर्मचोदनास्थळी पुरुषप्रवृत्तीचा साध्य यागादिरूप विषय आहे. तसा येथे कोणी नाही. सिद्ध ब्रह्माला तर पुरुषप्रवृत्तीने असाध्यत्व असल्यामुळे अविषयत्व आहे असा भाव. पण ब्रह्मवाक्याने पुरुष ज्ञानांत प्रवृत्त होतो. त्याने ज्ञानरूप विषयांत प्रवर्तकत्वाने त्याचा ब्रह्मबोधकत्व आहे? [illegible] 'पुरुष अवबोधांत' नाही असे मानल्यावर - 'त्यावर सांगतात'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

थावंबोधे लब्धत्। तस्मात्किमपि वक्तव्यं यदनंतरं ब्रह्मजिज्ञासोपदि
ष्यत इति। उच्यते - नित्यानित्यवस्तुविवेकः, इहामुत्रार्थफलभोगवि

॥ व्याख्यान ॥ इ.प्र. ७७४

६२।१९

उपसंहार करितात - 'तस्मात्' = म्हणून. भगवान् शिष्यांनी अथ शब्दाचा अर्थान्तराचा असंभव अ-
आनंतर्य वाचित्व असतां
त्यामुळे त्याच्या अवधित्वान 'किमपि' = कोणतेतरी पुष्कळ कारण 'वक्तव्यम्' = सांगितले पाहिजे
की 'यदनंतरम्' = ज्याच्या अनंतर सूत्रकारांकडून 'ब्रह्मजिज्ञासा उपदिश्यते' = ब्रह्मजि-
ज्ञासा उपदेशिली जाते 'इति' = शंकाप्रश्नाच्या परि समाप्ती करिता आहे. 'उच्यते' = सांगतो
'नित्यानित्यवस्तुविवेकः' - आत्मा नित्य असून त्याच्याहून अन्य सर्व अनित्य आहे असा विवेक.
'इहामुत्रार्थफलभोगविरागः' - या लोकातील व स्वर्ग लोकातील जे विषय त्यापासून होणारा

॥ विवरण ॥

प्रसंग-

१६०।१५ १६१।१६

- तत्प्रवृत्ति नाही. पुढील 'सांगतो - नित्यानित्यवस्तुविवेक' यापासून पर्यंत ग्रंथ स्पष्टार्थ आहे. शास्त्रीय विधीला
शास्त्रीयत्व अधिकार निमित्त सांगितले पाहिजे अशा अभिप्रायाने सांगतात - 'आत्मा नित्य असून' "य आत्मा
५५
अपहतपाप्मा विजरो विमृत्युः ... सोऽन्वेष्टव्यः" [छां. ८।७।१] या श्रुतिप्रकरणांत "तद्यथेह कर्मचितो लोकः

॥ विवरणव्याख्यान ॥

५२१।२२

अध्ययन, धर्मजिज्ञासा, कर्मानुष्ठानांच्या आनंतर्याचा अथ शब्दार्थत्वाचा असंभव असतांही इष्ट अशा ब्रह्मजिज्ञासेचे आनंतर्य
अथ शब्दार्थ आहे. अशी आशंका असतां सांगतात - 'शास्त्रीय विधीला' श्रवण विधीला शास्त्रीयत्व असल्यामुळे अधिकारी नि-
मित्तही शास्त्रीय सांगितले पाहिजे. दुसऱ्या शास्त्रीयत्वाचा असंभव असल्यामुळे शास्त्रीय साधन चतुष्टय अथ शब्दाने सं-
पणीय आहे असा अर्थ. साधनचतुष्टयाचा शास्त्रीयत्व कसे? अशी शंका असतां सांगतात - 'सोऽन्वेष्टव्यः' 'अन्वेषण' = शास्त्रपूर्वक
शोधाने आत्मतत्त्वाचे निर्धारण. साधन स्वर्गादिकांचे अनित्यत्व म्हणून सांगितले जाते असे सांगतात - 'तद्यथेह कर्मचितो'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विरागः शमदमादि साधन संपत् मुमुक्षुत्वं च ।

~~श्रीयत एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः क्षीयते [छां ८।१।६]~~

जो सुखरूपी फळभोग त्यापासून चित्ताची निरसता. 'शमदमादिसाधन संपत्' शम, दम, उपरम, तितिक्षा, श्रद्धा, समाधान ही षट्साधन संपत्ति " मुमुक्षुत्वं च " = मोक्षाची इच्छा.

॥ विवरण ॥

श्रीयत एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः क्षीयते" [छां ८।१।६] असा नित्यानित्यवस्तु विवेक दाखविला आहे. "परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन" [मुं १।२।१२] "आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति [बृ ४।५।६] असाही ज्ञानश्रवण विधि प्रकरणांत इहामुत्रार्थफलभोगविराग दाखविला आहे. "शान्तो दान्त उपरतः तितिक्षुः समाहितः श्रद्धावित्तो भूत्वाऽऽत्मन्येवात्मानं पश्येत" [बृ ४।४।२३] असेही दर्शनविधि प्रकरणांत शमादिक दाखविले आहेत. "तद्विजिज्ञासस्व" [तै ३।१] अशा विचार विधि प्रकरणांत 'वरुणं पितरमुपससार" [तै ३।१] असे गुरूपसदन दाखविले आहे. सर्वत्र तर फलश्रुति कामोत्पादनद्वारा मुमुक्षुत्व प्रसिद्धच आ.

॥ विवरणव्याख्यान ॥

'परीक्ष्य' = कर्मांनी निर्मित लोकांच्या अनित्यत्वाने विचार करून वैराग्याला प्राप्त व्हावे असा अर्थ. स्रक्चंदनादि साधनजाताला आपल्या शोभनत्वे प्रियत्व असल्यामुळे त्यांच्यांत प्रीति गौण असून आपल्यांत मुख्य आहे म्हणून आपल्याकरिता = आत्म्याकरिता आश्रय करावा. असे (याचा कांहीं फलभोग) वैराग्य "आत्मनस्तु कामाय" याने दाखविले आहे. असा अर्थ. 'शांतः' = अंतरिन्द्रिय (मन) व्यापाराच्या उपरमाने युक्त. 'दान्त' = बाह्येन्द्रिय व्यापारापासून वर्जित, 'उपरत' = इंद्रियांना पुनः विषयाकडे न जाऊं देणारा किंवा विधियुक्त संन्यासी. 'तितिक्षु' = शीतोष्ण सुखदुःख द्वंद्वाला सहन करणारा 'समाहित' = चित्तैकाग्र्यवान्. 'श्रद्धावित्तः' = गुरुवेदान्त [illegible] वाक्यांत श्रद्धावान् असा अर्थ. पण या विशेषणांला शक्यायत्व असले तरी मुमुक्षुत्व शास्त्रीय नाही. कारण तद्वाचक पदाचा अभाव आहे? यावर सांगतात - 'सर्वत्र तर' 'फलश्रुति' "तरति शोकमात्मवित् [छां ७।१।३]

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विवरण

धिकार प्रदर्शनार्थ आहेत. कारण अन्यथा साधनाच्या अनुष्ठानामुळेच फळाची सिद्धि होत असता त्याच्या (= फळाच्या) संकीर्तनाचे फल्य येते. ज्ञानाला अविधेयत्व असल्यामुळे त्याचे विधी हे त्याच्या साधनविधिपर आहेत. तेथें सर्व शाखा प्रत्ययन्यायाने [पूमी २।४।२८-३२] विधींच्या एकत्वाची उपपत्ति होते. असल्यामुळे —

॥ विवरणव्याख्यान ॥

"ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति" [मुं ३।२।९] इत्यादिक सांगितलेल्या अर्थाला विपक्षाच्या बाधक मुखाने उपपादन करीत आहेत — 'कारण अन्यथा' "ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति" इत्यादिकांना कामना प्राप्तीच्या द्वारा अधिकाराच्या निमित्ताच्या प्रतिपादकत्वाचा अभाव असतां फळाचे संकीर्तन व्यर्थ होते. त्यामुळे त्यांना अधिकाराच्या निमित्ताचे समर्पकत्व स्वीकारले पाहिजे असा अर्थ. पण 'सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः' इत्यादिकांत ज्ञानाला विहितत्व असल्यामुळे त्या प्रकरणपठित श्रवण-मननादिकाला विचार विधीचे अधिकार निमित्तत्व कसे? त्यावर सांगतात — 'ज्ञानाला अविधेयत्व'. पण भिन्न-प्रकरणपठित विशेषणांना घेऊन अधिकार निमित्तत्व कसे? त्यावर सांगतात — 'तेथें' = पूर्वतंत्रांत असा अर्थ. सर्व शाखा प्रत्ययाधिकरणाने निर्दिष्ट न्यायाने. हा अर्थ — कार्य सर्व शाखान्तरांत श्रूयमाण अग्निहोत्रादि भिन्न आहेत किंवा नाहीत? भिन्न आहेत असे पूर्वपक्षाने प्राप्त होते. कारण अभ्यास (= पुनः पुनः संकीर्तन) आहे. म्हणून भिन्नत्व आहे. जशा रीतीने अभ्यासाला वैयर्थ्य येते तशा रीतीने नामादिकाकडून हे भिन्नत्व आहे. तसेंच स्पष्ट आहे — "नामरूपधर्मविशेष पुनरुक्तिनिंदाऽशक्ति समाप्ति प्रायश्चित्तान्यार्थदर्शनात् शाखान्तरे कर्मभेदः" [पूमी २।४।२८] असें प्राप्त झालें असतां सिद्धान्त केला आहे "एकं वा संयोगरूप चोदनाख्याविशेषात्" [पूमी २।४।२९] याचा हा अर्थ — फलसंबंधाच्या उभयत्र अविशेष असल्यामुळे कर्म एक आहे. तसें द्रव्यदेवतोद्देशाने त्याग हें जें यागाचें स्वरूप त्याच्या ऐक्यामुळेही एकत्व आहे. तसें संज्ञेच्या ऐक्यामुळेच 'जुहुयात्' इत्यादि चोदनेच्या ऐक्यामुळेही ऐक्य आहे. जेथें तर एकमेकांना अभाव असतो तेथें सुद्धा असे म्हणून शाखाभेद असतांही कर्म विधीचें ऐक्य आहे. याप्रमाणे भिन्न शाख-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ विवरण ॥

